# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – ०९ जानेवारी २०१५

## मुंबई विद्यापीठ आणि शहर सुंदर आहे - रॉबिन वॉरेन

## रॉबिन यांच्या हस्ते फोर्ट कॅम्पसमधील शुशोभित आणि अद्ययावत लॉबीचे उदघाटन

मुंबई - गेल्या १५७ वर्षाची उज्वल आणि समृध्द परंपरा असलेले आणि देशातील सर्वात जुने विद्यापीठ म्हणून ख्याती असलेले मुंबई विद्यापीठ हे उत्कृष्ट विद्यापीठ आहे.तसेच हे विद्यापीठ आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत असुन हे मुंबई शहर सुंदर असुन आपल्या मुंबई भेटीदरम्यान मुंबई शहर आपल्याला आवडले असल्याचे प्रतिपादन जगप्रसिध्द नोबेल पारितोषिक विजेते रॉबिन वॉरेन यांनी केले.मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट कॅम्पसला रॉबिन वॉरेन यांनी आज भेट दिली. नव्याने वातानुकूलित करण्यात आलेल्या सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन कक्ष,फोर्ट येथील शुशोभित आणि अद्ययावत लॉबीचे उदघाटन रॉबिन वॉरेन यांच्या हस्ते करण्यात आले.

रॉबिन वॉरेन यांनी आपल्या भेटीदरम्यान विद्यापीठ प्रशासनाशी सखोल चर्चा केली.त्यांनी त्यांच्या भेटीदरम्यान सर जहांगीर कावसजी दीक्षान्त सभागृह आणि राजाबाई टॉवर आणि मुख्य ग्रंथालयाला भेट दिली.ग्रंथालयात असेलेल्या अतिप्राचीन आणि जुने हस्तलिखीत तसेच दुर्मिळ ग्रंथांची त्यांनी पाहणी केली.चारशे वर्षापूर्वीचे हस्तलिखीत पाहून रॉबिन भारावून केले.मुंबई विद्यापीठाने जतन करुन ठेवलेल्या या अतिप्राचीन आणि दुर्मिळ खजिन्याबद्दल त्यांनी कौतुक केले.

फिजीओलॉजीसाठी रॉबिन वॉरेन यांना २००५ साली नोबेल पारितोषिकांने सन्मानित करण्यात आले होते. मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या १०२ व्या भारतीय विज्ञान परिषदेसाठी त्यांना मुंबई विद्यापीठाने आमंत्रित केले होते.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)